**नियमित दिवाणी दावा क्र. ११/२०२१**

**राजेंद्र वि. कमला**

**निशाणी क्र. १५**

**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ म्हणुन राजेंद्र रामचंद्र बालपांडे यांची उर्वरीत उलटतपासणी प्रतिवादींचे अधिवक्ता श्री ए.एन. नारनवरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

११. मी व माझे कुटुंबिय वॉर्ड क्र. ७, नरखेड येथे राहतात. मी वाद जागा विकत घेण्यापूर्वी वर्तमानपत्रामध्ये जाहिर नोटीस दिली नव्हती. मला गणपती नासरे यांना किती भाउ बहिण आहेत हे पूर्वीपासून माहिती होते. गणपती नासरे व त्यांच्या भावा बहिणींमध्ये वाद जागा व इतर संपत्तीची वाटणी झाली होती. वाद जागेचे खरेदी खत करतेवेळी संबंधित कागदपत्रे गणपती नासरे यांनी विक्री पत्रासोबत जोडले होते. आता साक्षीदाराला निशाणी क्र. १७ वर दाखल असलेल्या विक्रीपत्राची प्रत दाखविण्यात आली. साक्षीदार विक्रीपत्र बघून सांगतो की, सदर वाटणीपत्राची प्रत विक्रीपत्रासोबत जोडलेली नाही. हे मला माहिती नाही की, विक्रीपत्र निशाणी क्र. १७ मध्ये वाद जागेचे मुल्य चुकीचे नमुद केलेले आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, वाद संपत्ती ही महादेव नासरे यांनी त्यांची मुले गणपती व विष्णु यांच्या नावाने विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, गणपती नासरे व प्रतिवादीमध्ये वादसंपत्तीची वाटणी न झाल्यामुळे गणपती नासरे यांना वाद संपत्ती विकण्याचा कोणताही अधिकार नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, गणपती नासरे यांनी आधीच अर्धी संपत्ती प्रतिवादीला बक्षिसपत्राद्वारे दिलेली आहे.

हे म्हणणे खरे नाही की, वाद जागेवर मागील ३२ वर्षापासून प्रतिवादीचा कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गणपती नासरे हे नागपुर येथे राहत होते.

**प्रतिवादींच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

सा. वा. दा. अ. ब. अ. क.केले　　　　　　समक्ष

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर
दिनांक ११.०६.२०२४

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर

**नियमित दिवाणी दावा क्र.११/२०२१**
**राजेंद्र वि. कमला**
**<u>निशाणी क्र. १५</u>**

**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ म्हणुन राजेंद्र रामचंद्र बालपांडे यांची उर्वरीत उलटतपासणी प्रतिवादींचे अधिवक्ता श्री ए.एन. नारनवरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी गणपती नासरे यांच्यापासुन वाद जागेचे केलेले खरेदी खत हे बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, गणपती नासरे यांना सदर खरेदी खत करुन देण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदी खताच्या अनुषंगाने माझा वाद जागेवर ताबा नाही. हे मला माहीती नाही कि दिनांक ०१.०२.२०२१ रोजी प्रतिवादीने माझ्याविरुध्द पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१.०२.२०२१ रोजी मी गुंड प्रवृतिच्या लोकांसह व नातेवाईकांसह प्रतिवादी राहत असलेल्या घरावर हल्ला केला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०२.२०२१ रोजी प्रतिवादीने माझ्याविरुध्द पोलीस अधिक्षक व पोलीस महानिदेशक यांच्याकडे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१७ वरील खरेदी खत हे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१.१२.२०२० व दिनांक ०१.०२.२०२० रोजी मी प्रतिवादी विरुध्द खोटी पोलीस तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेला सदर दावा हा चालण्याजोगा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दाव्यामध्ये माझ्या पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला**

**फेरतपास काही नाही.**

सा. वा. दा. अ. ब. अ. क.केले

समक्ष

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर
दिनांक २५.०६.२०२४

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते कि सदर पि.डी.एफ. फाईलच्या पुराव्यातील मजकुर हा मुळ पुराव्याच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**<u>लघुलेखकाचे नाव</u>**– अ.य.कुळकर्णी

PRAVIN RAMESH PATIL

Digitally signed by PRAVIN RAMESH PATIL
Date: 2024.06.26 05:31:13 +1200